# सगळेच नंबर २

आज नंबर २ ची कमाई लहान मुलाला देखील कळते. महाविद्यालयीन तरुण म्हणतात नंबर २ ची कमाई रग्गड पाहीजे मग नोकरी चपराश्याची पण चालेल. आज सरकार दरदिवशी भाव वाढवते. का? तर सरकारी तिजोरीत खडखडाट आहे. मला असा उपाय सुचवावासा वाटतो, तो असा की यापुढे सरकारी कर्मचाऱ्यांना पगारच देऊ नका व त्यांची नंबर २ ची कमाई तेवढी लिगल करुन टाका. सरकारचा आर्थिक बोझा खूप हलका होईल आणि अशा बिनपगारी नौकऱ्यांसाठी तरुण रांगा लावतील.

तसेच आज शाळा कॉलेजेसमध्ये पाठ्यपुस्तके कुणीच वाचत नाही. एकदम गुरुकिल्ली, २१ व्यवसाय पुस्तिका, Last Day Revision अशा पुस्तकांनी बाजार फुलून गेलेले दिसतात. मग पाठ्यपुस्तकांचा आग्रह का ? पाठ्यक्रमातच अमूक लेखकाची गाईडस्, अमक्या प्रकाशनाचा Twenty One, तमक्या शिक्षकांच्या व्यवसाय पुस्तिका, असे का ठेवत नाही ? ही नंबर दोन वाली तरुणपिढी जाम खूश होईल आणि तरुण पण म्हणतील, आता कस सुचलं सरकारला शहाणपण, "देर आये दुरुस्त आये."

आणखी एक सुचवू का ? शाळा, कॉलेजेस्‌ची आज खरच काही गरजच उरली नाही. सरकारनी सर्व शाळा, कॉलेजेस् बंद करुन त्या जागा शिकवणी वर्गांना भाड्यानी दिल्यास सरकारला खूप आर्थिक दिलासा मिळेल, तसेच शिक्षक, प्राध्यापकांना पगार सुध्दा द्यावा लागणार नाही म्हणजे, नंबर २ ची चलती झाल्यामुळे पुन्हा देश समृध्दीकडे वाटचाल करेल.

नंबर २ चा महिमा येवढा मोठा आहे की, आज आपण एकेकाळी शिक्षणासाठी नावाजलेल्या नालंदा विद्यापीठासारखी विद्यापीठे देऊ च शकत नसल्यामुळे आपले तरुण दुसऱ्या देशांमध्ये शिक्षणासाठी वळलेत. तरुण म्हणतील, काय करणार ? नंबर २ ! कसं रक्तातच भिनलयं, जावच लागत दुसऱ्या देशात.

सिने जगतात मोठ्या पडद्यापेक्षा छोटा पडदाच घराघरात पोहोचला. आज

नंबर एक वाल्या नायक, नायिकांपेक्षा नंबर २ च्या मॉडेल्स भाव खाऊन जातात. समाजात दुसरी बायकोसुध्दा मानाने मिरवतांना दिसते.

आज जवळ जवळ सगळेच तरुण द्विपदवीधर दिसतात कारण दोन दोन पदव्या गोळा करणं खूप सोप्प झालयं. खूप पुर्वी एक सुध्दा पदवी मिळवली की सत्कार व्हायचे. आज तरुण फोन करतात, एकदा ही कॉलेजमध्ये येणार नाही, फी कमी करुन टाका, फक्त परीक्षा तेवढी देईन. काय करणार ? कॉलेजची मान्यता टिकावायला विद्यार्थी हवेत. कारण कॉलेजची मान्यता मिळविण्यास कॉलेजेस्‌ची नोकरी मिळविण्यास प्राध्यापकांनी खूप नंबर २ चा पैसा दिल्यामुळे ते सुध्दा हतबल असतात. मग तरुण पण सहजतेने द्विपदवीधर होतात. कारण द्विपदवीधरांनाच प्राध्यापकांची नोकरी मिळते, हे जाणतात, आजचे तरुण आणि त्यांच्याच प्राध्यापकांकडून शिकून घेतात, नंबर २ चे धडे.

म्हणूनच बहुतेक आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशाच 'बे एक बे' म्हणजेच '२x१= २' ने होतो. खरचं नंबर २ चा महिमा फार फार मोठा आहे.